**अनुकंपा तत्वावर आरोग्य सेवक (पुरुष) (५० टक्के हंगामी फवारणी कर्मचारी व इतर उमेदवारांमधून) गट-क या पदावर नियुक्ती देणेबाबत**

जिल्हा परिषद अहिल्यानगर

आरोग्य विभाग

जिल्हा परिषद आदेश क्र.आरोग्य/आस्था-३/५०० /२०२५

दिनांक- 02/07/२०२५

संदर्भ--१.महा.शासन साप्रवि यांचेकडील शासन निर्णय क्रमांक अकंपा १२१७/प्र.क्र.१०२/८ दिनांक २१ सप्टेंबर २०१७

२.महा.शासन साप्रवि यांचेकडील शासन परिपत्रक क्र.अनुकंपा-१२२१/प्र.क्र.१८६/ का-८ दि.२६/०८/२०२१

३.म.जि.प.जि.से.(सेवा प्रवेश )नियम १९६७ मधील परिशिष्ट-(५) अ (३)व महाराष्ट्र शासन अधिसुचना दिनांक ०२/०६/२०१५

४.महाराष्ट्र शासन वित्त विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्रमांक अंनियो/ १००५/१२६/सेवा-४/दिनांक ३१/१०/२००५

५.मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर यांचेकडील अनुकंपा तत्वावर नियुक्ती संदर्भातील कार्यवाहीचे मंजुर इतिवृत्त दिनांक- २४/०६/२०२५

**कै.रामभाऊ एकनाथ सोळसे,** हे **मुख्याध्यापक** या पदावर जिल्हा परिषद सेवेत कार्यरत असताना त्यांचे दिनांक १३/११/२०२३ रोजी निधन झाल्याने त्यांचे पात्र वारसदार **श्री.वैभव रामभाऊ सोळसे,** यांनी स्वतःहास अनुकंपा तत्वावर नियुक्ती मिळणे संदर्भात अर्ज या कार्यालयास सादर केला आहे. त्यानुसार सदर अनुकंपा प्रकरणाची संदर्भीय शासन निर्णयामधील निर्देशांचे अधिन राहुन छाननी व पडताळणी केलेली आहे.

**श्री.वैभव रामभाऊ सोळसे,** हे म.जि.प.जि.से.(सेवा प्रवेश ) नियम १९६७ मधील परिशिष्ट- (५) अ (३) व महाराष्ट्र शासन अधिसुचना दिनांक ०२/०६/२०१५ मधीन तरतुदींनुसार आरोग्य सेवक (पुरुष) (५० टक्के हंगामी फवारणी कर्मचारी व इतर उमेदवारांमधून) गट-क या पदासाठी आवश्यक शैक्षणिक आर्हता धारण करीत असल्याने आरोग्य सेवक (पुरुष) (५० टक्के हंगामी फवारणी कर्मचारी व इतर उमेदवारांमधून) गट-क या पदावर अनुकंपा नियुक्तीसाठी पात्र ठरत आहेत. त्यानुसार,संदर्भीय शासन निर्णयामधील निर्देशानुसार मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन मी मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद अहिल्यानगर **श्री.वैभव रामभाऊ सोळसे,** यांना पुढे नमुद अटी व शर्तीच्या अधीन राहुन जिल्हा सेवेतील आरोग्य सेवक (पुरुष) (५० टक्के हंगामी फवारणी कर्मचारी व इतर उमेदवारांमधून) गट-क या सरळसेवेच्या पदावर सुधारीत वेतन संरचना एस-९: २६४००-८३६०० मध्ये अनुकंपा तत्वावर रकाना क्रमांक ४ मध्ये नमुद ठिकाणी पदस्थापनेने नियुक्ती करीत आहे.

| अ.क्र. | अनुकंपा तत्वावर नियुक्ती केलेल्या अर्जदाराचे नाव व पत्ता | जातीचा प्रवर्ग | निवडीचा प्रवर्ग | पदस्थापना ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | **श्री.वैभव रामभाऊ सोळसे** | अ.जा. | अ.जा. | उपकेंद्र सुरेगाव प्रा.आ.केंद्र धामोरी ता.कोपरगाव |

